Vol 3 Issue 9 Oct 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# भारतीय लोकशाहीतील उदासिन जनता, फसवे राजकारण आणि हतबल शासन

**व्ही. एस. इंगळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख गो. सी. गावंडे महाविद्यालय उमरखेड जि. यवतमाळ

***सारांश :***एकेक चांगला माणूस कितीही चांगली निवडणुका लढला तरी वैयक्तिक लढा काहीही करू शकणार नाही. असे अनेक लढे कोणत्याही परिणामा शिवाय गर्भगळीत झाले. चेंगिझखान सारखी प्रवृत्ती असणाऱ्यांच्या हाती सत्ता गेल्यावर यापेक्षा वेगळे काय घडणार?प्रथम क्रमांकावर भ्रष्टाचार नंतर कत्तली, दंगली, बलात्कार, लाठीचार्ज, जाळपोळ, फसवणूक, बेरोजगारी, महागाई, गरीबी, शोशन व उत्पिडन यांचा कितीही बोभारा झाला तरी ते होतच राहणार सत्ता हाती आल्या बरोबर सेवापरायणता आणि राजकारण परस्परापासुन दुरावतात सत्तेचा दुरूपयोग करून समाजात विषप्रयोग करणाऱ्यांमुळे आमची लोकशाही बटिक बनली आहे. नीति बरोबर अनीतिचा उपयोग राजकारणाला कलुशित करणारा ठरतो. ''सत्तेचा मार्ग मतपेटीतून जातो'' निवडणुका निर्णायक ठरत असल्यामुळे निवडणूक जिंकणे राजकारणाचे ध्येय झाले आहे. यासाठी पैसा व धर्माचा उपयोग केला जातो. भारतामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता, निरक्षरता, कर्तव्याचा अभाव आणि सरंजामशाहीचे झालेले खोल संस्कार यामुळे निवडणुकीच्या माध्यमातून मिळालेला जनमताचा कौल खऱ्या मतदानाला निष्प्रभ करून टाकतो. जातीयवाद, भ्रष्टाचार व गुन्हेगारी युक्त निवडणुका सर्वसामान्यांच्या लोकशाही करणाच्या प्रक्रियेतील प्रमुख अडथळे ठरताहेत. पैशाचा अमाप वापर, धाक, दडपशाही, प्रलोभने यांचा खुलेआम वापर होत असल्याने सर्वसामान्य माणुस निवडणूक लढविण्याचा विचारही करू शकत नाही. तसेच एकवेळ निवडून गेल्यानंतर पाच वर्षापर्यंत (लोकसभा व विधानसभा अस्तित्वात असे पर्यंत) पदावर राहत असल्याने मतदारांचा फारसा वचक राहत नाही. चर्चा, वादविवाद हाच लोकशाहीचा खरा आत्मा आहे. परंतु संसद व विधिमंडळाच्या कामकाजातून तोच नेमका हरवला जात आहे. गोंधळ प्रिय झाला आहे. सभासदासाठी गृहपाठ, चर्चा, अभ्यास नावाचा प्रकार राहलेला नाही.

### *प्रस्तावना :*

भारतीय लोकशाहीमध्ये भारतीय संविधान देशाची खरी मालमत्ता आहे. आपल्या राज्यघटनेत लोकशाही एक व्यवस्था म्हणून स्विकारली आहे. सार्वभौम सत्तेने निवडणुकीच्या माध्यमातुन बहूमताने कौल दिलेल्या राजकीय पक्षाला सत्ताधारी पक्षाचा मान मिळतो. ह्या बहूमत प्राप्त राजकीय पक्षातुन निवडलेल्या कार्यकारी मंडळाला शासन म्हणतात. हे जनतेद्वारा निर्वाचित असल्यामुळे त्याला लोकशाही शासन असे म्हणतात.

आपली इच्छा दुसऱ्यावर लादण्याच्या प्रयत्नातुन निर्माण झालेले दोन मानवांमधील संस्थामधील व घटकांमधील संबंध म्हणजे राजकारण होय. लोक भावनेचा आदर करून समाजामध्ये असलेल्या समस्या सोडविणे व जनतेच्या इच्छेनुसार शासन कारभार करणे सरकारची जबाबदारी आहे. जनतेची संमत्ती, विश्वास पर्यायाने कायदेमंडळामध्ये बहूमताचा पाठिंबा असेपर्यंत सरकार सत्तेवर राहू शकते. परंतु केंद्रात सध्या अस्तित्वात असलेले सरकार अल्पमतातील सरकार आहे. 273 ह्या जादुई संख्ये एवढे खासदार लोकसभेमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शासनाकडे नाही ह्यालाच जनतेचे (100 टक्के लोकांचे) सरकार म्हणावे काय?

### *लोकशाहीची मुलतत्त्वे :–*

सर्वसामान्य जनतेची इच्छा हाच लोकशाहीचा आधार आहे. लोकशाही केवळ शासन पद्धतीचा प्रकार नाही तर जीवनाच्या सर्व बाजूंना स्पर्श करणारा तो एक विचार आहे. वैयक्तिक व संकुचित वृत्तीचा त्याग करून सामाजिक बांधीलकीची जोपासना करणे, राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता टिकविणे व बंधूभाव वाढीस लावणे म्हणजे लोकशाही जीवन पद्धतीचा अंगिकार करणे होय. लोकशाही मध्ये चर्चा, वाटाघाटी, सनदशीर मार्गाचा अवलंब व बहूमताचा कौल यांना महत्व असते. त्याचबरोबर लोकशाही मार्गाने शासन कारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांनी मतदारांच्या मताचा आदर करावा व जनतेचा कौल मान्य करण्याची वृत्ती अंगिकारावी.

शासन संपुर्ण राज्याचे प्रतिनिधीत्व करते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या भेदभावा शिवाय कायदेशीर तरतुदीचा अवलंब करून सनदशीर मार्गाने सार्वजनिक हितसंबंधाची जोपासना करण्याचे काम सरकार द्वारा केले जावे अशी अपेक्षा असते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधूता या चतुःसुत्रीचा अवलंब करून शासन व्यवस्थेची उद्दीष्टये पार पाडावे असे भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत स्पष्ट केले आहे. भारतामध्ये नागरिकाला मुलभूत हक्क प्रदान करणारे संविधान आहे. स्वतंत्र, मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका लढविणारे निवडणूक आयोग आहे. स्वतंत्र न्यायपालिका आणि वृत्तपत्रांनाही स्वातंत्र्य आहे.

### *समाजातील भिषण वास्तव :–*

सर्वसामान्य जनतेच्या समस्यांना वाचा फोडणारे व्यासपीठ म्हणजे संसद. अस्तित्वात असलेल्या समस्या सोडविण्याचे व्रत स्विकारून शासन कारभार करणारे सरकार व जनता यामध्ये दुरावा निर्माण होत आहे. सरकारवर अंकुश ठेवणारे कायदेमंडळ आज सरकारला प्रतिसाद देणारे मंडळ म्हणून भुमिका पार पाडीत आहे. परिणामतः आत्महत्या करणारा शेतकरी, गरीबी, भ्रष्टाचार, कुपोषन, भूकबळी, बालमजूरी, स्त्रीभृणहत्या, महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी, प्रदुषण, नक्षलवाद, दहशतवाद, विदेशी गुंतवणूक, चीन व पाकिस्तान सीमेपलिकडून होणारी घुसखोरी व रूपयांचे अवमुल्यन यासारखे ज्वलंत प्रश्न आपले उग्ररूप धारण करीत आहे. यावर संसदेत कधी चर्चा होणार?ती सोडविणे सरकारची प्राथमिकता असावी. परंतु त्याकरिता सरकारने राजकीय इच्छाशक्ती व प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. गरीबीचे निर्मूलन करण्याकरिता आर्थिक दृष्ट्या मागास घटकांना योजनांच्या माध्यमातून सहकार्य, भ्रष्टाचाराला पायबंद घालण्यासाठी लोकपाल, माहितीचा अधिकार, कुपोषन व भूकबळी कमी करण्यासाठी अन्न सुरक्षा विधेयक, सकस आहार योजना, बालमजूरी व महिलांवरील अत्याचार थांबविण्यसाठी शिक्षणाचा कायदा, कामगार कायदा, गुमास्ता कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, गर्भपात कायदा, गर्भजल परिक्षण कायदा, अशाप्रकारचे महिलांवरील अत्याचार विरोधी कायदे करण्यात आले. परंतु प्रभावी अंमलबजावणी अभावी वरील समस्या कमी होण्याऐवजी दिवसें दिवस वाढत आहे.

### *राज्यकर्त्यांचा व्यवहार :–*

राजकारण हे समाजसेवेचे साधन आहे. प्रातिनिधिक शासन व्यवस्थेतील निवडून दिलेले प्रातिनिधी जनतेची सेवा करण्याऐवजी मालकाप्रमाणे व्यवहार करीत आहे. मालक (सार्वभौम) असलेल्या जनतेला नौकराप्रमाणे वागविले जात आहे. मतदारांच्या मतांद्वारे निवडले जाणारे प्रातिनिधी स्वतःला राजेशाहीचे वारसदार समजू लागले. एकेकाळी हिमालयाच्या रांगेसारखी उत्तुंग व प्रभावी व्यक्तिमत्व असणारे नेतृत्व, त्यांचे वक्तृत्व, शिक्षण व सामाजिक वर्चस्व असलेल्या वर्गाची संसदेत मक्तेदारी होती. वर्तमान परिस्थितीत मात्र उच्चशिक्षीत, प्रामाणिक, चारित्र्य संपन्न व दिलेला शब्द पाळणारे लोकप्रतिनिधी निवडून आणने बंद होत आहे. आणि विविध गुन्ह्यांतर्गत न्यायालयात खटले सुरू असलेले (विद्यमान संसदेमध्ये 162 खासदार), संसदेमध्ये जनतेचे प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेणारे(2005 मध्ये स्टींग ऑपरेशन द्वारा सिद्ध झाालेले 12 संसद सदस्य) खासदार,

सत्तेच्या गणितासाठी चालविलेली धडपड, खूर्ची (पंतप्रधान पद) टिकविण्यासाठी खासदारांच्या होणाऱ्या खरेदी–विक्रीचे प्रमाण वाढत आहे. स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी सत्तेचा अमरपट्टा घेऊन आल्यासारखे वागणाऱ्यांमध्ये शिस्त व चारित्र्याचा अभाव असल्याचे अनेकदा पुढे आले. अविश्वास ठरावाचे वेळी गुन्हेगार खासदारांशी हात मिळवणी करणे, नोटांची बंडले सभागृहामध्ये आणने, विधेयकाच्या प्रती फाडणे, सभागृहामध्ये मारामारी करणे, राजदंड पळविणे, कामकाज बंद पाडणे, गोंधळ घालणे अशा कृत्यामुळे संसदेला आखाड्याचे स्वरूप प्राप्त होत आहे. सभागृहामध्ये अपेक्षित असणाऱ्या उच्च दर्जाच्या चर्चेचा स्तर घसरत चालला आहे. महागाईचा डोंब उसळत असतांना पगाराचा वर्शाव पाडून घेणारे नवसंरजामदार स्वतःचे वेतन व मानधन वाढविण्यासाठी एकमताने ठराव मंजूर करतात. भरीसभर प्रातिनिधींना पेन्शन देण्यासंबंधीचा ठरावही मंजूर करून घेतात. वास्तविक दुसऱ्या क्षेत्रातील मानधन धारकांना पेन्शन दिल्या जात नाही. केवळ वेतन धारकांना पेन्शन(निवृत्ती वेतन) दिल्या जाते.

भारतामध्ये साधारणपणे खालील तीन गोष्टी आश्चर्य कारक आहे.
1.स्वतःचे वेतन /मानधन स्वतःच ठरविण्याचा अधिकार संसद सदस्याला आहे.
2.न्यायाधीशांची निवड न्यायाधीशांकडूनच होणे.
3.संसदेची स्वतःची दुरचित्रवाणी(लोकसभा आणि राज्यसभा).

एकीकडे शासनकर्त्याची मनमानी तर दुसरीकडे जनतेचा राजकारणाकरील विश्वास ह्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. सरकार स्थापनेसाठी कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहूमत नाही. परिणामी कायदेमंडळीय शासन व्यवस्थेचा प्रभाव कमी होऊन न्यायालयीन सक्रीयता वाढली आहे. यासक्रीयतेमुळे नक्की प्रशासनाची बांधीलकी कुणाशी आहे हा प्रश्न निर्माण होतो.

***यश, प्रगती व नैतिकता यांचे मापदंड :–***

लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संयमाची व जबाबदारीची किंमत मोजावी लागते. अणुशक्तीकडून महाशक्तीकडे भारताचा प्रवास सुरू असला तरी विकासाचे फायदे गरजू माणसापर्यंत किती पोहचेल हा प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहे. जनतेला मदत करण्याच्या नावाखाली किती सबसिडी द्यावी, किती सवलती द्याव्यात याविषयी मर्यादा निश्चित करावी. युरोपीय राष्ट्राच्या लोकसंख्येएवढे असंघटीत काामगार आणि तेवढेच लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असतील तर बरेच अंतर चालायचे आहे याचे भान लोकशाहीतील राज्यकर्त्यानी ठेवले पाहिजे. समाज राजकीय दृष्ट्या सक्रीय व जागरूक असावा. कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी. राजकारणी, सेलिब्रेटी किंवा श्रीमंत लोकांकरिता कायदा लवचिक करू नये. राजकीय पक्षांनीही आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. पहिल्या लोकसभेचे सदस्य रिशंग कैशिंग यांच्या मते ''पंतप्रधान नेहरू, लोकसभाध्यक्ष मांवळकर, जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी, एन. सी. चटर्जी व आचार्य कृपलानी यासारखी स्वातंत्र्य लढयात भाग घेतलेली मंडळी गांधी टोपी घालून सभागृहात उपस्थित राहत तेव्हा मंदिराच्या गाभाऱ्यात आल्यासारखे वाटायचे तर लोकसभाध्यक्ष संतासारखे वाटायचे'' असे ते म्हणत.

***कुसुमाग्रजांच्या शब्दात –***

ठावे न कोठे मज काय झाले
गेले जळोनी मन मानवाचे........
मांगल्य सारे पडले धुळीत........
चोहीकडे नर्तन हिंस्त्रचे.........

संसदेचे कामकाज वारंवार तहकुब होत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेत चुकीचा संदेश जात आहे. चर्चा कमी व गोंधळ जास्त अशा लौकीकांमुळे तरूण पिढीला स्वारस्य उरलेले नाही. राज्यकर्ते, देशवासी, देश बांधवांनी सद्सद्विवेक व संवैधानिक नितिमत्ता बाळगुन देशात बंधूभाव जोपासून देशाची एकात्मता व अखंडता टिकविण्याची गरज आहे.

***दिशाहीन शासन कारभार :–***

सत्ता केंद्रीत राजकारणाने बरेचदा सरकारचे निर्णय वरंवरं आकर्षक परंतु मुलतः विकासाला मारक ठरत आले आहे. आम्हाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अमेरिकेला श्रीमंत होतांना पाहिले व भांडवलशाहीची कास धरली. रशिया व चीनच्या साम्यवादानेही भुरळ घातली. आणि इथेच आमची चूक झाली. आम्ही घोडयावर बसून विमानातून उडण्याची स्वप्ने पाहली. येथील संसाधनाचा, पर्यावरणाचा, मनुष्यबळाचा व बौद्धिक संपदेचा विचार करून विकास योजना आखल्या गेल्या असत्या तर आज आपनही विकसित देशाच्या पंक्तित विराजमान झालो असतो. आमच्याकडे चटक आणि चंगळवादाला रोखू शकेल असे नेतृत्व नाही. पैसा मिळविणे हे एकमेव उद्दीष्टये नगरपरिषदेपासुन लोकसभेपर्यंत सर्व संस्थांमध्ये वावरणाऱ्या व्यक्तिचे आहे. काही अपवाद वगळता राजकारणात आलेली सर्व माणसे फाटकी व शेतकऱ्याची मुलं होती. ती आज गडगंज धनवान झालेली लोक पाहत आहेत. अशा स्थितीत ''मेरा भारत महान'' हे वाक्य इमारतीच्या भिंतीवर अगदी ठळकपणे लिहीतात. त्यामुळे देश महान बनत नाही. देश चारित्र्यातुन घडत असतो. महात्मा गांधी, पं. नेहरू, सरदार पटेल, सुभाषबाबु यांनी केवळ भाशन केले नाही कृती केली. त्यांच्या कृतीतून त्यांचे चारित्र्य घडले. पंधरावी लोकसभा कामकाजाचा निच्चांक गाठणार त्यामुळे एक मोठा समाज घटक लोकशाहीच्या न्याय व समान वाटपाला पारखा ठरतो आहे. आर्थिक व्यवहारांना केंद्रस्थानी ठेऊन येनकेन प्रकारे सत्ता मिळविण्यासाठी लोकशाहीचा बळी दिला जात आहे. तुरळक अपवाद वगळता सारेच राजकीय पक्ष तत्वज्ञान विसरून सत्तेच्या साठमारीत अनेक अनैतिक तडजोडी स्वीकारतात. आणि हिच खरी लोकशाही बनत चालली आहे. सामूहिक निर्णय उचित व न्याय असणे हेच खरे लोकशाहीचे मर्म आहे. पंधरावी लोकसभा नविन विक्रम प्रस्थापित करणार आहे. उन्हाळी 2013 च्या अधिवेशनापर्यंत सर्वात कमी कामकाज (एकून 1157तास) पंधराव्या लोकसभेने केले. सर्वात जास्त पाचव्या लोकसभेने 4072 तास काम केले. दोन्ही सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासासाठी 2012 मध्ये राखून ठेवण्यात आलेल्या 146 तासापैकी केवळ 57 तास काम वापरले. ह्या लोकसभेत एकून 390 विधेयके मांडण्याचे ठरले होते. एप्रिल 2013 पर्यंत त्यातील फक्त 187 विधेयके मांडल्या गेलीत. 365 विधेयकावर चर्चा करून ती संम्मत करण्याचे ठरले होते. त्यातील केवळ 96 संम्मत झालीत 115 विधेयकावर चर्चा होऊन मंजुरीची वाट पाहत आहेत. राजकीय पक्ष गुन्हेगारांना संरक्षण देऊन

आपले सुरक्षा कवच मजबुत करीत आहे. असे सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयाद्वारे स्पष्ट केले.(न्यायपालिकेचे स्वातंत्र्य व लोकशाहीची ताकद–दैनिक वृत्तपत्र, नवराष्ट्र 19/4/2007) कर्तव्य पालनाच्या नावावर राजकारणी जे काही कार्य करतात त्याला कर्तव्यपालन म्हटले जाऊ शकत नाही असे म्हटले आहे. प्रसार व प्रचार माध्यमाकडून दाखविण्यात येणारे प्रक्षेपण व संसदेतील कामकाजाच्या वेळीची स्थिती व व्यवहार ह्यावरून भारतात येणाऱ्या पर्यटकांनी, उद्योजकांनी मुल्यांकन करण्याचे ठरविले तर भारत हे अपयशी राष्ट्र ठरेल कोणत्याही देशाच्या लोकशाहीचे सामर्थ्य जाणून घेतांना त्या लोकशाहीत लोकांचा सहभाग किती प्रमाणात आहे हे पाहणे महत्त्वाचे असते. मतदानाची घसरलेली टक्केवारीही मतदारांची उदासिनता दाखविणारी आहे. मतदारांची ही मानसिकता राजकारणाच्या उबगवाण्या चित्रामुळे झाली की त्याचे समोर कोणताही स्पष्ट पर्याय ठेवण्यात राजकीय पक्ष अपयशी ठरल्यामुळे बनली?ह्यामुळे मतदार उदासिन की राजकारण फसवे?ह्याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे.

***प्रादेशिक पक्षाचा वाढता प्रभाव :–***

संसदे सारख्या लोकशाहीच्या पवित्र मंदिरात होत असलेली लोकशाहीची थट्टा व निर्माण होत असलेला तीडा सोडविण्यास सरकार हतबल होत आहे. परंतु यावेळी अनेक राजकीय पक्ष मिळून अस्तित्वात आलेले आघाडी सरकार असे कारण पुढे केले जाते. कारण खूर्ची कायम टिकविण्यासाठी सहकारी घटक पक्षाचे लाड पुरविणे आवश्यक असते. परिणाम स्वरूप राष्ट्रीय पक्ष सर्वात मोठा पक्ष असतांना सुद्धा कठपुतली सारखी स्थिती आहे. व संसदेच्या कामकाजाची चाबी प्रादेशिक पक्षाकडे आल्याचे चित्र पाहावयासे मिळते. उदा. बाळासाहेब ठाकरे, प्रकाशसिंग बादल, चंद्राबाबु नायडू, मायावती, जयललीता, करूणानिधी, नितीशकुमार व नविन पटनायक हे संसदेमध्ये नसतांना सुद्धा तेथील कामकाजाला प्रभावित करतात सत्तेसाठी सी.बी.आय. सारख्या तपास यंत्रणेचा साधन म्हणून दुरूपयोग करणाऱ्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला न्यायालयाने फटकारलेले आहे. अणुकराराच्यावेळी साम्यवादी पक्षांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यानंतर विरोधी पक्षांनी मांडलेल्या अविश्वास ठरावाच्या वेळी तुरूंगातील खासदार मोहम्मद शहाबुद्दीन, पप्पु यादव(राजद), मोहम्मद अतिक अहमद, मोहम्मद अफजल अन्सारी(सपा), सुरजसिंह (लोजपा), यांना सत्ताधारी पक्षाकडून सम्मानाने आमंत्रित करण्यात आले. मतदानाचे वेळी सभागृहात सर्वांसमक्ष संपुआ च्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी व पंतप्रधान मा. मनमोहन सिंग यांनी हस्तांदोलन करून आभार मानले. तसेच घटक पक्ष विशिश्ट विभागाचे मंत्रिपद मिळविण्यासाठी बोलणी केल्याशिवाय पाठिंबा देत नाहीत. सर्वात मोठा पक्ष (राष्ट्रीय पक्ष) त्यांची मागणी मान्य करून आपले स्थान भक्कम करतात. परंतु त्यामुळे प्रदेशिक पक्ष राष्ट्रीय राजकारणात वरचढ होत आहे.

***30टक्के लोकांच्या बहूमताची लोकशाही :–***

मतभेद हे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे असे म्हणतात. परंतु मतभेदाला मनभेदाचे

मनभेदाला व्यक्तीभेदाचे
व्यक्तीभेदाला व्यक्तीद्वेशाचे
व्यक्तीदोषाला व्यक्तीसुडाचे

स्वरूप आले तर लोकशाहीचे पावित्र्य आणि मांगल्य संपेल आणि लोकशाहीचा आत्माच नष्ट होईल. जनतेच्या न्यायालयात पराभूत झाल्यानंतर सुद्धा पराभव मान्य करणारे नेते आमच्या लोकशाही देशात अभिमानाने वावरत आहेत. व मंत्रिमंडळामध्ये महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी सोपवितांना पहावे लागत आहे. 30टक्के लोकांच्या बहूमताची लोकशाही आज आपल्या देशात 100 टक्के जनतेचे प्रतिनिधीत्त्व व नेतृत्त्व करीत आहे.सध्याच्या बहूमताचा आवाज हा खरा आवाजही नाही, तो एक गोंगाट आहे. विरोधी मतांचा आवाजही ऐकू आला पाहिजे तरच ती (बहूमत+अल्पमताची) लोकशाही ठरेल. जेथे जनतेच्या समस्येची चर्चा होत नसेल, उपाय शोधण्यासाठी कोणी बोलणार नसेल तर सत्ता व स्वार्थासाठी लढविल्या जाणाऱ्या आणि जनतेचे प्रश्न हरविलेल्या निवडणुका हव्यातच कशाला?असा प्रश्न जनतेनी विचारल्यास त्याचे उत्तर कोण देईल? निवडणुकीला एक मोठा गुंतवणुकीचा इव्हेंट समजून कोट्यावधी रूपयाची उधळण केली जाते. अशा निवडणुका म्हणजे लोकशाहीची क्रुर चेष्ठाच म्हणावी लागेल. ग्रामीण क्षेत्रातील राजकारण सरकारी योजनामधून लुटलेल्या पैशाचे खुले मैदान बनले आहे. सत्ता व संपत्तीचे मालक सामान्य लोकांना एकमेकाविरूद्ध सतत लढवून लाखो–करोडो रूपये हडपुन टाकतात. कुणाला तुडवायचे, कुणाला घडवायचे, कुणाला नाडवायचे, या समीकरणावर सत्तेचा व संपत्तीचा खेळ सुरू आहे. पराकोटीची आर्थिक विषमता आणि अन्याय हा इथल्या लोकशाही सोबत आपणच मांडलेल्या लाचार संसाराचा परिणाम आहे. सत्याग्रहाच्या नावावर सत्ताधीशा सोबत वेळप्रसंगी संलग्नीकरण करून आंदोलनाची विटंबना केल्यास प्रमाणिक आंदोलन किती दिवस टिकणार?दारिद्रयावर समाधान काढणारा तोडगा शोधल्या जातो त्यामुळे आंदोलकाची भाषाही मवाळ होते. वेगवेगळ्या योजना नागरिकांची चेतना दाबून त्यांना याचकाच्या भूमीकेत जमा करीत आहे. यामुळे गरीबी मिटत नाही. त्यामुळे गरीबीमधीलच काही लोक भ्रष्टाचाराच्या तंत्राचा भाग बनून गरीबांची एकता तोडण्याचे काम करतात. नक्षलवाद आणि दहशतवादामध्ये बळी पडणाऱ्यांच्या कुटुंबाना कोण जवाब देणार! चीन व पाकिस्तान विवाद सोडविण्यासाठी किती लोकांच्या मृत्यनंतर कठोर पावले उचलणार आहोत. आमच्या सैनिकांच्या मृतदेहाची होणारी विटंबना (डोके शरीरापासुन वेगळे करणे, शरीरा वरील अवयव कापणे) केव्हा थांबविणार आहोत.

जेव्हा केंद्रात एकाच पक्षाचे स्पष्ट बहूमतातील सरकार सत्तेवर येईल तेव्हाच कठोर निर्णय घेऊन व्यवस्था नियंत्रणात ठेवणे शक्य होईल. उदा. 1971 ला इंदिरा गांधीचे सरकार स्पष्ट बहूमतात असतांना बांग्लादेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व बांग्लादेशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

''लोक वजा होतात तिथे लोकशाही संपते''
नेता
नेत्यासाठी खूर्ची
खूर्चीसाठी सत्ता
सत्तेसाठी बहूमत
बहूमतसाठी निवडणूक
निवडणुकीसाठी प्रचार
प्रचारासाठी कार्यकर्ते
कार्यकत्यांसाठी सुविधा
सुविधेसाठी पैसा
पैशासाठी भ्रश्टाचार
भ्रश्टाचारासाठी योजना
योजनासाठी देश
देशासाठी नागरिक
नागरिकासाठी मतदान
मतदानासाठी राजकारण
राजकारणासाठी नेता
नेता
नेत्यासाठी

—ॲड. अनंत खेळकर


*संदर्भ :–*

1.दैनिक वृत्तपत्र, नवराष्ट्र, 19 एप्रिल 2007.
2.दैनिक वृत्तपत्र, देशोन्नती, 08 मे 2011.
3.www.democracy.com
4.www.criminalpolitics.com
5.डॉ. व्ही. एस. इंगळे, शोधप्रबंध, महाराष्ट्रातील राजकारणाचा चिकित्सक अभ्यास, जुलै 2008
6.कौशिक सूशिला , भारतीय शासन एवं राजनिती, हिंदी माध्यम कार्यान्वय



[illegible] दिल्ली विश्वविद्यालय, 1990.
7[illegible]
[illegible] ऑक्टोबर 2011.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net